ePaper **भुजबळ फडणवीसांच्या भेटीला, दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा**




| वर्ष - 8 | अंक - 205 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™


## आतील पानांत


- मानाच्या दोन्ही गदा परत करणार!
- नताशा आई म्हणून ग्रेटच...
- अमेरिकी मालावर आयात शुल्काची घोषणा!




www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 5 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


# मुंबई महानगरपालिकेचा तब्बल

# ₹ 74,427.41 हजार कोटींचा अर्थसंकल्प!

## अर्थसंकल्पामध्ये मुंबईकरांवर करवाढ, दरवाढ आणि शुल्क वाढ नाही



### मुंबई महापालिका अर्थसंकल्पातील महत्वाचे...

- हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शहरी हरितीकरण प्रकल्प
- आनंदवन हरित पट्टा
- गोरेगाव मुलुंड लिंक रोडवर उभारणार वाघाचे शिल्प
- लंडन आयच्या धर्तीवर उभारणार मुंबई आय

### विकासकामांसाठी तरतूद

- बेस्ट अनुदान : १००० कोटी रुपये
- शिक्षण विभाग : ३२४१ कोटी रुपये
- घनकचरा व्यवस्थापन विभाग : ५५४८ कोटी रुपये
- पर्जन्य जलवाहिनी विभाग : ३०३९ कोटी रुपये
- कोस्टल रोड प्रकल्प : १५४५ कोटी रुपये
- रस्ते आणि वाहतूक विभाग : ६५१९ कोटी रुपये
- पूल विभाग : ८३६९ कोटी रुपये
- आरोग्य विभाग : १९५८ कोटी रुपये
- प्रमुख रुग्णालये : २४५५ कोटी रुपये
- वैद्यकीय महाविद्यालये : ५७९ कोटी रुपये
- विशेष रुग्णालये : ३०६ कोटी रुपये
- जल अभियंता विभाग : ४३७२ कोटी रुपये
- पाणी पुरवठा प्रकल्प खाते : ४०५६ कोटी रुपये
- मलनि:सारण प्रचालन विभाग : १९७२ कोटी रुपये
- मलनि:सारण प्रकल्प खाते : ४३९ कोटी रुपये
- मलनि:सारण प्रकल्प कामे : ६५३२ कोटी रुपये
- नगर अभियंता विभाग : ३३९५ कोटी रुपये
- विकास नियोजन विभाग : १८३१ कोटी रुपये
- उद्यान आणि प्राणिसंग्रहालय : ७३१ कोटी रुपये
- कोळीवाड्यांच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांची ठोक तरतूद

**। मुंबई । महाईन्यूज**

**देशातील सर्वात मोठी आणि श्रीमंत महानगरपालिका म्हणून ख्याती असणाऱ्या मुंबई महानगर पालिकेचा अर्थसंकल्प मंगळवारी ,4 फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात यंदा तब्बल 14.19 टक्के वाढ झाली आहे. यंदा मुंबई महापालिकेचा सन 2025 – 26 चा अर्थसंकल्प तब्बल ₹ 74,427.41 हजार कोटी रुपयांचा आहे**

> “ स्वच्छ, शाश्वत आणि सक्षम मुंबईसाठी कटिबध्द या मंत्राचा नारा देत हा अर्थसंकल्प सादर केला आहे .वित्तीय शिस्त आणि शाश्वतता, अर्थसंकल्पीय तरतुदींच्या अनुषंगाने वित्तीय शिस्त, पायाभूत सेवा सुविधांचे सक्षमीकरण, गुणवत्तापूर्ण आरोग्य व शिक्षण व्यवस्था, स्वच्छ आणि शाश्वत पर्यावरण, सामाजिक उपक्रम, प्रशासकीय व कार्यालयीन कार्यक्षमता आदींवर भर देत अर्थसंकल्पाचा ताळमेळ साधण्याचा प्रयत्न केला आहे.
>
> – **भूषण गगराणी,** आयुक्त, मुंबई महानगर पालिका.

मुंबई महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी आयुक्त भूषण गगराणी यांना हा अर्थसंकल्प सादर केला. 60.65 कोटी रुपये शिलकीच्या या अर्थसंकल्पात महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ भूषण गगराणी यांनी मुंबईकरांवर कोणत्याही प्रकारची करवाढ, दरवाढ आणि शुल्क वाढ लादलेली नाही. हाती घेण्यात आलेल्या विकास प्रकल्प कामांना गती देतानाच आर्थिक संकटातही जनतेवर कोणताही बोजा न लादता महसूल वाढीवर अधिक भर देण्यात आला आहे. यावेळी महापालिका अतिरिक्त डॉ विपीन शर्मा, महापलिका सचिव रसिका देसाई , उपायुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड, उपप्रमुख लेखापाल गोसावी उपप्रमुख लेखापाल (अर्थसंकल्प)अरुण जाधव आदी उपस्थित होते.

चालू अर्थसंकल्प हा ५९ हजार ९०० कोटींचा मांडण्यात आला होता तो सुधारीत करून त्याचे आकारमान ६५, १८० कोटींवर नेण्यात आले आणि आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान या सुधारीत अर्थसंकल्पाच्या तुलनेत १४.१९ टक्क्यांनी वाढवून ७४,४२७.४१ कोटी रुपयांवर नेवून ठेवले आहे. यामध्ये भांडवली खर्चाकरता ४३ १६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर महसुली करता ३१,२०४ कोटी रुपये खर्च होणार आहे. चालू आर्थिक वर्षांत १२,११९ कोटी रुपये इतका निधी तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणद्वारे वळता केला होता, परंतु आगामी अर्थसंकल्पात ही रक्कम १६,६९९ कोटी रुपये एवढी दर्शवली आहे. त्यामुळे अंतर्गत कर्जावरच अर्थसंकल्पाचा आकडा वाढवण्यात आल्याचे दिसून येत आहे. महापालिका आयुक्तांनी या अर्थसंकल्पात महसूल वाढीवर भर देतानाच विकास नियोजन खात्याकडून ९७०० कोटी रुपयांचा महसूल प्रस्ताविला आहे. मालमत्ता कराचा महसूल ५२०० कोटी रुपयांवर प्रस्तावित केले आहे. गुंतवणुकीवर व्याजातून २२८३ कोटी रुपये, जल आणि मलनि:सारण करातून २३६३ कोटी रुपयांचे महसूल अपेक्षित मानला आहे. याशिवाय अग्निशमन दलाकडून शुल्कापोटी ७५९ कोटी रुपये, परवाना विभागाकडून ३६२ कोटी रुपये, शासनाकडील थकबाकीची रक्कम ६५८१ कोटी रुपये अशाप्रकारे महसूल वाढीचे स्त्रोत दर्शवले आहेत.

# शहर-ग्रामीण संघर्षाची चिन्हे!

## पुणे महापालिकेचा वाढता पाणीवापर ठरणार डोकेदुखी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेचा वाढता पाणी वापर आणि पाण्याची उपलब्धतता हा आगामी काळात शहर विरुद्ध ग्रामीण भाग असा संघर्ष निर्माण करणार असल्याची चिन्हे आहेत. भविष्यातील पाणी वापर ३४ टीएमसीपर्यंत पोहोचेल, असा पुणे महापालिकेचा अंदाज आहे. खडकवासला धरण साखळीतील पाण्याची उपलब्धतता पाहता जलसंपदा विभागाने यंदा महापालिकेला १४.६१ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर केला आहे, तर महापालिकेचा यंदाचाही पाणी वापर २१ टीएमसीहून अधिक राहणार आहे.**



जलसंपदा विभागाने गेल्या आठवड्यात २०२४-२५मधील बिगर सिंचनाच्या पाण्याचा हक्क मंजूर केला. विभागाने तसे पत्र महापालिकेला पाठवले असून, त्यामध्ये एक जुलै २०२४ ते ३० जून २०२५ या काळातील पाणी वापराचा कोटा नमूद आहे. पुणे महापालिकेची २०३१मधील संभाव्य लोकसंख्या ७६ लाख १६ हजार असेल, असे गृहीत धरून १४.६१ टीएमसी पाणी मंजूर करण्यात आले आहे. महापालिका सध्या रोज १६२८.१२ कोटी लिटर पाणी वापरते. या हिशेबाने या वर्षी किमान २१ टीएमसी पाणी लागेल. मंजूर कोट्यापेक्षा महापालिकेचा पाणी वापर सात टीएमसीने अधिक असल्याने महापालिकेसाठी ती चिंतेची बाब बनली आहे. महापालिका गेल्या चार वर्षांपासून २२ टीएमसीहून अधिक पाणी वापरते आहे. पुणे शहराला इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत असले, तरी उपनगरे तहानलेलीच आहेत. महापालिका प्रशासन समान पाणीपुरवठा योजना राबवत असले, तरी पाण्याची गळती शोधण्यात फारसे यश आलेले नाही.

समाविष्ट गावांना फटका महापालिकेने समाविष्ट ३४ गावांसाठी १० पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केल्या आहेत. तीन योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत. महापालिकेच्या १० पैकी तीन योजनांची कामे सुरू करण्यात आली आहेत, तर दोन योजनांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे. नन्हे, आंबेगाव बुद्रुक आणि खुर्द, कोळेवाडी, जांभूळवाडी या गावांसाठी राबविण्यात येणाऱ्या पाणी योजनांसाठी ३८९ कोटी रुपयांचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे.

धायरी, खडकवासला, नांदोशी, नांदेड, किरकटवाडी आणि सणसनगर या गावांसाठी ४०८ कोटी रुपयांचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे. या गावांना देण्यासाठी महापालिकेकडे पाणीच नसल्यामुळे या योजना रेंगाळल्या आहेत, अशी माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली. पाण्याचे राजकारण पुणे महापालिकेने २०५०चा विचार करून वाढती लोकसंख्या विचारात घेऊ ३४ टीएमसी पाणी शहराला लागेल, अशी मागणी सरकारकडे केली आहे.

### मुळशीतून पाच टीएमसी पाण्याची मागणी

खडकवासला धरणसाखळीतील चारही धरणांची पूर्ण क्षमता ही २९ टीएमसी इतकी आहे. मुळशी धरणातून पाच टीएमसी पाण्याची मागणी करण्यात आली आहे. पुणे शहराची पाण्याची वाढती 'तहान' चिंताजनक आहे. राज्य सरकारने यामध्ये तातडीने लक्ष घालून महापालिकेची मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पांसाठी अर्थसाह्य करण्याची आवश्यकता आहे. महापालिकेचा मंजूर पाण्याचा कोटा आणि प्रत्यक्ष पाणी वापर यामधील फरक कमी करण्यासाठी अधिकाधिक पाण्याचा फेरवापर करण्याची गरज आहे. अन्यथा पुणे ग्रामीण विरुद्ध शहर असा संघर्ष निर्माण होईल. तसेच, पुणेकरांना भविष्यात दिवसातून एकदा पाणी पुरवठा, दिवसाआड पाणीपुरवठा आदी समस्यांना सामोरे जावे लागेल.

> शहरातील पाणी वापर पाहता मीटरने पाणीपुरवठा झाला पाहिजे. कोकणातील नद्यांमधील पाणी पुणेकरांना कसे आणायचे, याचा विचार झाला पाहिजे. पुण्याची पाण्याची वाढती तहान लक्षात घेता अतिरिक्त पाणी कसे आणायचे याचा विचार आत्तापासून करायला हवा.
>
> **- व्ही. जी. कुलकर्णी,**
> माजी मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका

# मिसिंग लिंकसाठी निधी द्या!

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची राज्य सरकारकडे मागणी !

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शहरातील वाहतुकीची कोंडी सुटण्यासाठी 'मिसिंग लिंक' जोडावी लागणार असून, ८०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यापैकी ५० टक्के निधी राज्य सरकारने द्यावा, यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे कोथरुडचे आमदार आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.**



कोथरूड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न आणि शहरातील रस्त्याच्या मिसिंग लिंक संदर्भात चंद्रकांत पाटील यांनी महापालिकेत बैठक घेतली. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी तसेच भाजपचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना पाटील म्हणाले, 'शहरात वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत असून, वाहनांच्या संख्येतही वाढ होत आहे. यासाठी अर्धवट राहिलेल्या मिसिंग लिंकची कामे झाल्यास वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी महापालिकेला द्यावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.''नागरिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत नाहीत. अनेक भागात रस्ते रुंदीकरणासाठी आवश्यक असलेली जागा संबंधित मालक महापालिकेला देत नाहीत. यामुळे अनेक मिसिंग लिंक तयार झाल्या आहेत.

### 500 कोटींची तरतूद

जागा मालकाला टिडीआर, एफएसआय नाही तर रोख मोबदला हवा आहे. प्रत्येकालाच रोख मोबदला द्यायचा झाल्यास महापालिकेला ते शक्य नाही. महाप्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार शहरात ३१ मिसिंग लिंक अशा आहेत, त्या पूर्ण केल्या तर शहरातील अनेक भागांतील वाहतुकीचा प्रश्न सुटेल. या मिसिंग लिंकसाठी सर्वसाधारण ८०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.' असेही पाटील म्हणाले. 'कोथरुड विधानसभा मतदार संघात १५ मिसिंग लिंक आहेत. या लिंक जोडण्यासाठी सर्वसाधारण ३७३ कोटी रुपये लागणार आहेत. या मिसिंग लिंकची कामे तातडीने व्हावीत, यासाठी यातील निम्मे पैसे राज्य सरकारने द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करणार आहे. महापालिकेचा अर्थसंकल्प तयार करताना महापालिका प्रशासनाने देखील शहरातील मिसिंग लिंक जोडण्यासाठी ५०० कोटींची तरतूद करावी.' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

## पिंपरी-चिंचवड शहरातील एनएच-48 महामार्ग

# सेवा रस्त्यांचा होणार विस्तार!

### वाहतूक होणार सुरळीत, नागरिकांसाठी ठरणार महत्त्वाचा प्रकल्प

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या एनएच-४८ महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांचा (सर्व्हिस रोड) विकास करण्याच्या दिशेने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एनएचएआय प्रकल्प हाती घेत आहे. हा प्रकल्प वाढत्या वाहतूक समस्यांचे निराकरण करण्यासोबतच कनेक्टिव्हिटी सुधारणे, रस्त्यावरील वाहनांची वर्दळ कमी करणे आणि सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांपैकी एक असलेल्या या रस्त्यावरील शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**






पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील एनएच-४८ महामार्गाच्या बाजुने असणारा सध्याचा रस्ता १२ मीटर रुंद आहे. आता या रस्त्याचा १२ मीटर विस्तार करून एकूण रुंदी २४ मीटर करण्यात येणार आहे. एनएच-४८ हा एक महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असल्याने पुनावळे, भूमकर चौक, हिंजवडी आणि बालेवाडी या भागांतील वेगाने वाढणाऱ्या रहदारीच्या दृष्टीने हा विकास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये एनएच-४८ महामार्ग आणि सेवा रस्त्यांसह एकूण कॅरेजवे ६० मीटर लांबीचा आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजनात असलेले प्रत्येकी १२ मीटर रुंद विकास आराखडा (डीपी) रस्ते आहेत. त्यामुळे या रस्त्याची एकूण रुंदी ८४ मीटर होईल. यामुळे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी मदत होईल.

#### नागरिकांच्या दीर्घकालीन मागण्यांना प्रतिसाद

कनेक्टिव्हिटी सुधारण्याच्या दृष्टीने नागरिकांनी सेवा रस्त्यांची स्थिती सुधारण्याची मागणी सातत्याने केली जात होती. सद्यस्थितीतील सेवा रस्त्यांची दयनीय अवस्था, पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या आणि यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत अनेक प्रवासी आणि व्यवसायिकांनी वेळोवेळी तक्रारी येत होत्या. अखेर नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा प्रकल्प लवकरच सुरू होत आहे.

> एनएच-४८ हा महामार्ग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महत्त्वाचा वाहतूक मार्ग आहे. पिंपरी चिंचवड शहर आता एक औद्योगिक नगरी म्हणून पुढे आली आहे. येथे शहरीकरण झपाट्याने झाले आहे. त्यामुळे आता एनएच-४८ महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. नवीन सेवा रस्त्यांमुळे मुख्य महामार्गावरील गर्दी कमी होईल. वाहतूक व्यवस्थापन सुधारेल. स्थानिक प्रवाशांसाठी आणि व्यवसायांसाठी सुलभ प्रवेश मिळवून देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल. हा प्रकल्प शहराच्या दीर्घकालीन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे.
> -शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका

#### प्रकल्पाची वैशिष्ट्ये ....

या प्रकल्पासाठी ६०४.५९ कोटी रुपयांचा अंदाजे खर्च असून रुंदीकरण आणि सुधारित सेवा रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी लक्षणीय प्रमाणात कमी होईल, प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होईल.

\यासोबतच रस्त्याच्या टिकाऊपणासाठी काँक्रीट फुटपाथ, पाणी साचण्यापासून बचावासाठी प्रगत निचरा प्रणाली, स्थानिक प्रवाशांसाठी आणि व्यवसायांसाठी वाहतूक अधिक सोयीस्कर आणि सुलभ होणार आहे.

---

## विविध विकास कामांना स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता

### आकुर्डीत अग्निशमन केंद्र उभारणे, वाकड मधील रस्त्यांचे काँक्रीटीकरण होणार

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आकुर्डी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनजवळ अग्निशमन केंद्र उभारणे तसेच मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड (२४ मीटर डी.पी रस्ता) व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड (१८ मीटर डी.पी रस्ता) तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे अशा विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली.**




स्थायी समिती आणि महापालिका सभेची मान्यता आवश्यक असलेले विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी आज झालेल्या बैठकीत ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शहरातील सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणे तसेच जीव आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी पुरेशा अग्निसुरक्षा सेवेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आकुर्डी येथील हेडगेवार भवनजवळ अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. या कामासाठी ३० कोटी ६४ लाख रुपये इतकी निविदा रक्कम निश्चित करण्यात आली असून कामाची मुदत १८ महिने इतकी आहे. या इमारतीमध्ये १० मजले असून एकूण ६ अग्निशमन बंबाची व्यवस्था करण्यात येणार आहे. आगीच्या घटनांमध्ये होणाऱ्या जिवीत व वित्त हानीला रोखण्यासाठी तसेच या आपत्कालीन परिस्थितीला तत्परतेने सामोरे जाण्यासाठी हे केंद्र महत्वाचे ठरणार आहे. या अग्निशमन केंद्राच्या उभारणीस येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मान्यता दिली.


#### प्रकल्पांतर्गत विविध कामे...

या प्रकल्पाअंतर्गत सुरक्षित पदपथ, सुनियोजित पार्किंग, पावसाळी पाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय रस्ता दुभाजक आणि सायकल ट्रॅक देखील तयार केले जाणार आहे. यामुळे आरामदायी प्रवास व दळणवळणास मदत मिळणार असून वाहतुक कोंडी कमी होऊन नागरिकांच्या इंधनाची बचत होण्यास मदत मिळणार आहे. या प्रकल्पास येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समिती सभेत मंजुरी दिली. याशिवाय जान्हवी महिला बचत गट, शुभश्री महिला बचत गट, सावित्रीबाई फुले स्वयंसहायता महिला बचत गट, कमलाई स्वयंसहायता महिला बचत गट, आशिर्वाद स्वयंसहायता महिला बचत गट, महर्षी वाल्मिकी महिला बचत गट, मे. लोकसेवा स्वयंसहायता महिला बचत गट, ऐश्वर्या महिला बचत गट यांना सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांचे स्वच्छता व देखभाल दुरूस्तीचे काम देणे,

मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड या २४ मीटर रूंद आणि १४२० मीटर लांबी असलेल्या तसेच सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड या १८ मीटर रुंद आणि ११२० मीटर लांबीच्या रस्त्याचे तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतच्या १८ मीटर रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने

## भगवंताच्या नामानेच वासनाक्षय !



आपण सर्व जीव वासनेत गुंतलेले आहोत, कारण आपला जन्मच वासनेत आहे. वासना म्हणजे, 'आहे ते असू द्याच, आणि आणखीही मिळू द्या' असे वाटणे. आपण सध्या या स्थितीत आहोत. पण सुरुवात म्हणून आपण असे म्हणावे की, 'आहे ते असू द्या, आणि आणखी मागायचे ते परमेश्वराजवळ मागू या.' म्हणजे, मिळाले तर 'भगवंताने दिले', आणि न मिळाले तर 'त्याची इच्छा नाही', अशी जाणीव होऊन 'दाता परमात्मा आहे' ही भावना वाढू लागेल; आहे तेही त्याच्याच इच्छेचे फळ आहे असे वाटू लागून अस्वस्थता आणि आसक्ति कमी होऊ लागेल; आणि आसक्ती कमी होऊ लागली की, 'हवे-नको' कमी होऊन वासना ओसरू लागेल. केवळ आपल्या कर्तबगारीने वासनेच्या पलीकडे जाणे अशक्य आहे; त्याला शरणागतीशिवाय गत्यंतर नाही. याकरिता योग्य संगतीचाही फार उपयोग होईल. एखाद्या बैराग्याची संगती केली तर स्वाभाविकच कपड्याचे प्रेम कमी होईल, पण एखाद्या शेटजीच्या संगतीत राहिलो तर छानछोकी करण्याकडे प्रवृत्ती होईल. म्हणून अशा संगतीत राहावे की, ज्यामुळे शरणागती यायला मदत होईल.

शरणागती म्हणजे परमेश्वराला सर्वस्वी अर्पण होऊन राहणे; याचाच अर्थ, आपण उपाधिरहित बनणे. तर मग आपण अशाच साधनाची संगती केली पाहिजे, की जे अत्यंत उपाधिरहित आहे. हे साधन म्हणजे भगवंताचे नाम. काळ, वेळ, परिस्थिती, उच्चनीच भाव, स्त्री-पुरुष, विद्वता-अडाणीपणा, श्रीमंती-गरिबी, प्रकृतीची सुस्थिती-दुःस्थिती वगैरे कोणतीही गोष्ट नामाला आड येऊ शकत नाही. तसेच, त्याला कोणतीही उपकरणे लागत नाहीत. ते हृदयात सतत आपल्याबरोबर बाळगता येते. नामात वैराग्याचे कष्ट नाहीत, आणि कुठेही, केव्हाही ते बरोबर नेता येते. त्यासाठी विषयाची तदाकारवृत्ती सोडली पाहिजे. 'भगवंत माझ्या मागे आहे' अशी श्रद्धा राखली की वृत्ती विषयाशी तदाकार होत नाही. मारुतीने दिलेली मुद्रिका पाहिल्यावर सीतेला रामाच्या स्वरूपाची आठवण झाली, त्याप्रमाणे नाम घेताना आपल्याला त्याची आठवण झाली पाहिजे.

भगवंताच्या अनुसंधानात जो राहिला त्याने काळावर सत्ता गाजविली. अशा लोकांना मरणाचे भय कुठून असणार ? भगवंताला सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरत नाही; आणि जिथे वासना उरली नाही तिथे काळाचा शिरकाव होत नाही. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. वासनेच्या क्षयामध्ये आपलेपणाचे मरण आहे, आणि हे मरण डोळ्यांनी पाहण्यासाठी आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे.

**बोधवचन:- वासनेचा क्षय भगवंताच नामात आहे हे अक्षरशः खरे आहे.**

# दिल्लीत यावेळी नक्की 'कमळ' च फुलणार !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**अरविंद केजरीवाल यांची आम आदमी पार्टी म्हणजेच 'आप' आणि भारतीय जनता पार्टी यांच्यातील रस्सीखेच दिल्लीत अगदी शिगेला पोहोचली आहे. प्रचाराची रणधुमाळी संपली, तोफा थंडावल्या आणि आता मतदानाचा दिवस आला. दोन्ही बाजूंनी तुफान आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या असल्या तरी यावेळी सगळीकडे 'कमळ' च बाजी मारणार आणि सत्ता भाजपाचीच येणार असे चित्र आहे. गेल्या वेळी 'आप' कडे अमर्याद सत्ता आली होती. 70 पैकी तब्बल 67 निवडून आणून 'आप' ने एक उच्चांक गाठला होता. पण, अमर्याद सत्तेचे तोटे काय याचा त्यांनी कधी विचार केला नव्हता..आणि त्यातूनच मग उद्भवली एकापाठोपाठ एक अनेक भ्रष्टाचार आणि घोटाळ्याची प्रकरणे !**

### भाजपाचे बोट भ्रष्टाचारावर

प्रचाराच्या रणधुमाळीत भाजपाच्या आरोपांचा मुद्दा होता तो मध्य घोटाळ्यात केजरीवाल यांच्या टीमने केलेला प्रचंड घोटाळा! त्याचबरोबर त्यांना दुसरा मुद्दा मिळाला तो म्हणजे केजरीवाल्यांनी राहण्यासाठी उभे केलेले शीशमहल.. भाजपाचे सर्व नेते या दोन मुद्द्यांभोवती प्रचार करत असले तरी ते खोडून काढणे मात्र केजरीवाल आणि त्यांच्या टीमला अजिबात जमले नाही आणि प्रचारातच त्यांची पीछेहाट झाली.

### दिल्लीचे मतदार आगळे वेगळे

दिल्लीचे मतदार म्हणजे एक आगळावेगळा प्रकार आहे. एखाद्याला उचलून धरायचे ठरवले तर त्याच्या स्पर्धकाला ते भुईसपाट करतात. हाच अनुभव गेल्या वेळी अरविंद केजरीवाल यांना आला. त्यावेळी भाजपाचा सुखडा साफ झाला होता. यावेळी मात्र दिल्लीच्या गल्लीबोळात एक फेरफटका मारला तर सगळीकडे कमळाचीच हवा आहे. केजरीवाल आणि त्यांचा कंपू हळूहळू आपली तुरुंगातील जागा आरक्षित करणार, असे काहीसे चित्र आहे.

### भाजपाला दिल्लीचे तख्त हवे आहे

एक गोष्ट नक्की की, केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला दिल्लीची सत्ता कायम राखायची आहे, तर केंद्रात सत्तेची हॅटट्रीक संपादन करणाऱ्या भाजपाला दिल्लीचे तख्त खेचून घ्यायचे आहे. दिल्लीच्या निवडणुकीत काँग्रेसची अवस्था दयनीय आहे. यापूर्वी सलग पंधरा वर्षे दिल्लीवर राज्य करणाऱ्या काँग्रेसला यावर्षी तरी दिल्ली विधानसभेत खाते उघडायला मिळणार का? हा खरा प्रश्न आहे.

### 'आप' चा भ्रष्टाचार चव्हाट्यावर

गेल्या वर्षभरात केजरीवाल व त्यांचे सरकारमधील सहकारी किती भ्रष्ट आहेत हे भाजपाने दिल्लीकर जनतेपुढे मांडले. केजरीवाल यांच्यासह तिघा मंत्र्यांनाही जेलमध्ये काही दिवस काढावे लागले. त्यामुळे गेली बारा वर्षे केजरीवाल यांची असलेली लोकप्रियता या निवडणुकीत कायम आहे की घसरणीला लागली आहे, याचा कस या निवडणुकीत लागणार आहे. शेकडो कोटींच्या भ्रष्टाचारांच्या गंभीर आरोपांमुळे व मद्य विक्रीच्या धोरणात सरकारचे कोट्यवधी रुपये नुकसान झाल्याचा ठपका ठेवला गेल्याने यावेळी आम आदमी पक्षाला फटका बसणार आहे.

### सव्वीस वर्षे भाजपाकडे सत्ता नाही!

भाजपाची १९९३ ते १९९८ या काळात दिल्लीवर सत्ता होती. अगोदर मदनलाल खुराणा, नंतर साहिबसिंग वर्मा आणि शेवटी काही महिने सुषमा स्वराज असे पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री भाजपाने दिल्लीला दिले. नंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वच्या सर्व सातही खासदार दिल्लीकरांनी अनेकदा निवडून दिले, पण, गेल्या २६ वर्षांत भाजपाला दिल्ली



विधानसभेची सत्ता मिळवता आली नाही. यंदाच्या निवडणुकीत दिल्लीत मोदींची जादू चालेल का हाच कळीचा मुद्दा आहे. भाजपा किंवा काँग्रेस या दोन्ही पक्षांकडे दिल्लीला सर्वमान्य नेता नाही. आम आदमी पक्षाकडे केजरीवाल आणि त्यांची फौज आहे. भाजपाकडे कार्यकर्ते आहेत पण दिल्लीला चेहरा नाही, हे मान्य करावेच लागेल!

### आयारामांना भाजपाची उमेदवारी

आप आणि काँग्रेसमधून आलेल्या हायप्रोफाइल नेत्यांनाही या निवडणुकीत भाजपाने उमेदवारी दिली आहे. दिल्ली काँग्रेसचे माजी अध्यक्ष अरविंद सिंह लवली, तसेच आपचे माजी मंत्री राजकुमार चौहान, कैलाश गेहलोट, राजकुमार आनंद हे भाजपाच्या तिकिटावर लढत आहेत.दिल्ली विधानसभेची निवडणूक आप व भाजपाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे. तसेच तीनही प्रमुख राजकीय पक्षांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी रेवड्यांची उधळण केल्याने निवडणूक चुरशीची व रोचक बनली आहे. केजरीवाल यांनी मुख्यमंत्री झाल्यावर आरोग्य सेवा, शालेय शिक्षण यावर भर दिला आणि सार्वजनिक बस प्रवासात मोफतची सवलत दिली.

### केजरीवालांच्या रेवड्यांची टिंगल

सरकारी शाळा खासगी शाळांसारख्या आधुनिक व दर्जेदार बनवल्या. सरकारी इस्पितळात विश्वसनीय सेवा व सुधारणा केल्या. सेवांचा दर्जा व सुधारणा या आधारावरच दिल्लीकर मतदारांनी केजरीवाल यांच्या पक्षाला दोन वेळा प्रचंड बहुमत देऊन विधानसभेत सत्ता दिली. केजरीवाल यांच्या मोफत रेवड्यांची टिंगल भाजपाने भरपूर केली. पण, त्याचे अनुकरण मध्य प्रदेशने केले. तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महिलांसाठी लाडकी लक्ष्मी योजना सुरू केली. भाजपाला लक्ष्मी योजनेने विधानसभा जिंकून दिलीच शिवाय या राज्यातून भाजपाचे २९ खासदार लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. नंतर झारखंड, महाराष्ट्रातही महिलांसाठी मोफत योजनांच्या घोषणा झाल्या. 'लाडकी बहीण' किंवा 'लक्ष्मी योजना' राबवताना उमेदवाराला किंवा राजकीय पक्षांना कोणताच खर्च येत नाही. सरकारी खजिन्यातूनच महिलांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा होतात. महिलांना पैसे मिळतात आणि त्यांची मते रेवड्या वाटणाऱ्या पक्षाला मिळतात. दिल्लीतील विधानसभा निवडणूकही रेवड्यांच्या घोषणांवरच लढवली जात आहे. २०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे ७० पैकी ६७ जागांवर आमदार निवडून आले. दिल्लीने एकमुखाने केजरीवाल यांना पाठिंबा दिला.

### घोडा मैदान जवळ आहे

घोटाळे व भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली केजरीवाल यांना जेलमध्ये जावे लागल्याने आतिशी यांच्यावर पक्षाने मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली. आतिशी या भले मुख्यमंत्री असल्या तरी पक्षाचे सर्वेसर्वा सुप्रीम नेते हे केजरीवालच आहेत. आधुनिक सरकारी शाळा, मोहल्ला क्लिनिक, महिलांना मोफत बस प्रवास, २०० युनिटपर्यंत वीज मोफत, २० हजार लिटर पाणी मोफत, ज्येष्ठांना मोफत तीर्थयात्रा अशा घोषणा राबवत केजरीवाल यांनी दिल्लीतील सत्ता मिळवली. आता तर लाडकी बहीण योजनेची जादू फिरवली आहे. रेवड्यांच्या शर्यतीत भाजपा व काँग्रेसही सामील झाली आहे, स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात कोणालाच रस नाही, हे दुर्दैवाने नमूद करावे वाटते.

बघू या, घोडा मैदान अगदी जवळ आले आहे. केजरीवाल्यांच्या रेवड्यांची यावेळी ताकद दिसत नाही काँग्रेस तर पूर्वीच भुईसपाट झाली असून सध्या व्हेंटिलेटरवर आहे, त्यामुळे, आत्ताची परिस्थिती पाहता आणि नरेंद्रजी मोदी यांची पुन्हा आलेली लाट पाहता दिल्लीमध्ये पुन्हा कमळ फुलणार असे म्हणण्याचे म्हणूनच धाडस करावे वाटते !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पालकमंत्रीपदांचा गोंधळ काय?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितली सत्यस्थिती

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात तीन महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार विजय मिळवत पुन्हा एकदा सत्ता मिळवली. त्यानंतर भाजपाच्या देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडली तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे अजित पवार यांना उपमुख्यमंत्रीपद मिळाले. मंत्रिमंडळ विस्तारानंतर पालकमंत्रीपदाच्या नियुक्तीसाठी बराच वेळ लागला. इतकेच नव्हे तर पालकमंत्रीपदाच्या नियुक्त्या जाहीर झाल्यानंतर महायुतीमध्ये रायगड आणि नाशिकवरून गोंधळ निर्माण झाल्याचेही पाहायला मिळाले. दरम्यान या पालकमंत्रीपदाच्या गोंधळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे..**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सर्वजण पालकमंत्रीपद मिळावे यासाठी का आग्रही असतात असा प्रश्न विचारला होता. याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “पालकमंत्री हा त्या जिल्ह्याचा प्रमुख असतो. आता काही जिल्हे असे आहेत की, जिथे दोन पक्षांची चांगली ताकद आहे. एखाद्या ठिकाणी तिन्ही पक्षांची चांगली ताकद आहे. त्यामुळे प्रत्येकाची इच्छा असते की, आपला पालकमंत्री असावा, जेणेकरून आपल्या पक्षाला अधिक न्याय देता येईल. त्याचबरोबर तिथल्या आमदारांनाही वाटते की, पालकमंत्री आपल्या पक्षाचा असावा. त्यासंदर्भात आम्ही काही निर्णय केले. पण, त्यातील दोन निर्णय आम्हाला थांबवावे लागले.”

…चर्चा करून मार्ग काढू

पालकमंत्री पदाच्या नियुक्तीनंतर रायगड आणि नाशिकच्या निर्णयांवरून महायुतीमध्ये काहीशी नाराजी पाहायला मिळाली होती. त्यावरही देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, “पालकमंत्री पदाबाबत जे दोन निर्णय थांबवले आहेत, त्यावर चर्चा करून मार्ग काढू.”

दरम्यान मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपानंतर एका महिन्यानंतर, महायुती सरकारने राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांसाठी पालकमंत्र्यांची नावे जाहीर केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याची जबाबदारी स्वीकारली आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबई शहर आणि ठाण्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

### फडणवीसांनी टाकला सगळ्या चर्चांवर पडदा

राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होऊन जवळपास दोन महिने झाले आहेत. मात्र, अद्याप राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्षा बंगल्यावर राहायला गेलेले नाहीत. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी वेगवेगळे आरोप केले आहेत. त्यांच्या आरोपानंतर राज्याचं राजकारण चांगलंच तापलं आहे. खरं तर महाराष्ट्राचं सत्ताकेंद्र म्हणून वर्षा बंगल्याला एक महत्व आहे. मात्र, असं असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अद्याप वर्षा बंगल्यावर राहण्यास का गेले नाहीत? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत. मात्र, आता या सर्व चर्चांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर मत व्यक्त केलं आहे.

सध्या वर्षा या निवासस्थानाबाबत अनेक चर्चा सुरु आहेत. नक्की काय आहे? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, “मला असं वाटतं की अलिकडच्या काळात काही बाबतीत मीडिया वेड्यांचा बाजार होतोय. माफ करा, पण स्पष्ट सांगतो. आज मी एका माध्यमांवर पाहतो होतो की वर्षा पाडणार? काय वेड्यांचा बाजार आहे? वर्षा ही काय कोणाच्या घरची मालमत्ता आहे का? असं आहे की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा निवासस्थान सोडल्यानंतर त्या ठिकाणी मला जायचं आहे. पण त्यापूर्वी त्या ठिकाणी काही छोटी-मोठी कामे सुरु होती. दरम्यानच्या काळातच माझी मुलगी १० वीत आहे. १७ तारखेपासून तीची परीक्षा सुरु आहे. त्यामुळे ती म्हणाली की माझी परीक्षा झाल्यानंतर आपण तिकडे शिफ्ट होऊ. त्यामुळे मी वर्षा निवासस्थानावर सध्या शिफ्ट झालो नाही. मुलीची परीक्षा झाल्यानंतर मी वर्षा या निवासस्थानावर शिफ्ट होणार आहे. मात्र, सध्या एवढ्या वेढ्यासारख्या

---

# जामिनावर सुटल्यानंतर सूरज चव्हाण मातोश्रीवर

## उद्धव ठाकरेंनी दोन वाक्यात केले कौतुक

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई उच्च न्यायालयाने शिवसेना ठाकरे गटाचे नेते सूरज चव्हाण यांना खिचडी घोटाळ्यातील आरोपांमध्ये जामीन मंजूर केला आहे. एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मिळाला. उद्धव ठाकरे यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी युवासेनेच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. केला.**





शिवसेना ठाकरे गटातील युवासेनेचे नेते आणि आदित्य ठाकरेंचे निकटवर्तीय सूरज चव्हाण यांना खिचडी घोटाळ्याप्रकरणी ~~मुंबई हायकोर्टाने जामीन मंजूर~~ केला आहे. सूरज चव्हाण यांना 1 लाखाच्या रोख जात मुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. सूरज चव्हाण यांना 17 जानेवारी 2024 रोजी अटक करण्यात आली होती. लॉकडाऊनच्या काळातील या घोटाळ्याबाबत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आरोप केले होते. सूरज चव्हाण यांना जामीन मिळाल्यानंतर ते त्यांच्या कुटुंबासह मातोश्रीत दाखल झाले. यावेळी ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी सूरज चव्हाण यांचे कौतुक केले.

### युवासेनेच्या कार्यकर्त्यांची गर्दी

शिवसेना ठाकरे गटाचे नेते सूरज चव्हाण यांना हायकोर्टाकडून जामीन मिळाल्यानंतर युवासेनेच्या कार्यकर्त्यांनी तुरुंगाबाहेर मोठी गर्दी केली होती. सूरज चव्हाण यांच्या जामीन अर्जावर न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली होती. ज्यात तथ्य आढळल्यानं हायकोर्टानं सूरज चव्हाण यांना एक लाखाच्या रोख बाँडवर सुटका करण्याचे आदेश हायकोर्टानं दिले आहेत. यानंतर आज त्यांनी आर्थर रोड तुरुंगातून सुटका करण्यात आली. सूरज चव्हाण यांची सुटका होणार असल्याचे कळताच तुरुंगाबाहेर युवासेनेच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी पाहायला मिळाली.

### उद्धव ठाकरे काय म्हणाले?

“आज सूरज चव्हाण यांच्या मुलाचा वाढदिवस आहे. त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याचे वडील घरी आले आहेत. आज मला या गोष्टींचा आनंद आहे. मला खरोखरच तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा अभिमान आहे. आज खूप आनंदाचा क्षण आहे. खरंच एक निष्ठावान शिवसैनिक कसा असायला हवा, त्याचं एक उत्तम उदाहरण सूरजने सर्वांसमोर ठेवलं आहे. सर्वच लोक विकाऊ किंवा गद्दार होऊ शकत नाही, हे एका कडवट, कट्टर आणि सच्चा शिवसैनिकाने दाखवून दिले आहे”, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिली.

### सूरज चव्हाण कुटुंबासह मातोश्रीवर

सूरज चव्हाण यांच्या स्वागतासाठी अनिल परब आणि स्थानिक आमदार मनोज जामसुतकरही उपस्थित होते. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर सूरज चव्हाण संपूर्ण कुटुंबासह उद्धव ठाकरेंचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीवर पोहोचले. यावेळी स्वत: सूरज चव्हाण, त्यांची आई, बाबा, त्यांची दोन मुलं, पत्नी असा परिवार उपस्थित होता.

# अमेरिकी मालावर आयात शुल्काची घोषणा!

## कॅनडावरील करालाही महिनाभर स्थगिती; चीनचे ट्रम्प यांना प्रत्युत्तर

।बीजिंग।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चिनी उत्पादनांवर आयात शुल्क लादण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेला चीनने प्रत्युत्तर दिले असून, अनेक अमेरिकी उत्पादनांवर आयात शुल्क लादण्याचा निर्णय जाहीर केला. त्याशिवाय गुगल कंपनीची चौकशी करण्यासह अन्य काही उपाययोजनांचीही घोषणाही चीनने मंगळवारी केली. हे निर्णय ऊर्जा क्षेत्रापासून स्वतंत्र अमेरिकी कंपन्यांना लागू होणार आहेत.**




~~चीन अमेरिकेतून आयात केल्या~~ जाणाऱ्या कोळसा व द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) उत्पादनांवर १५ टक्के आयात शुल्क लागू करेल. तसेच कच्चे तेल, शेतीसाठी लागणारे यंत्रे आणि मोठ्या इंजिनाच्या कार यावर १० टक्के शुल्क लागू केले जाईल. हे आयात शुल्क पुढील सोमवारपासून, १० फेब्रुवारीपासून अमलात येईल. चीन हा जगातील सर्वात मोठा 'एलएनजी'चा आयातदार देश आहे. ऑस्ट्रेलिया, कतार आणि मलेशिया हे चीनचे मुख्य निर्यातदार असून 'एलएनजी'चा सर्वात मोठा निर्यातदार देश असलेल्या अमेरिकेकडून चीनला निर्यात केल्या जाणाऱ्या 'एलएनजी'चे प्रमाण फारसे नाही.

बेकायदा स्थलांतरित भारतीयांची पाठवणी; मोदी-ट्रम्प भेटीची वाट न पाहता अमेरिकेची कारवाई

डोनाल्ड ट्रम्प येत्या काही दिवसांत चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याबरोबर संवाद साधणार आहेत. त्यावेळी काही मध्यममार्ग काढण्यासंबंधी चर्चा होऊ शकते. अमेरिका आणि चीनने यांच्यातील व्यापारयुद्ध नवीन नाही. यापूर्वी २०१८मध्ये अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी चिनी मालावरील आयात शुल्क वाढवले होते आणि चीननेही त्याला उत्तर देताना अमेरिकी उत्पादनांवर अधिक कर लादला होता.

> अमेरिकेने एकतर्फी लादलेले आयात शुल्क जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे उल्लंघन करते. त्यामुळे त्यांच्या समस्या सुटणार नाहीतच, पण त्याबरोबरच त्यामुळे चीन आणि अमेरिकेदरम्यानच्या सामान्य आर्थिक व व्यापारी सहकार्याचेही नुकसान होईल.
>
> –'स्टेट कौन्सिल टॅरिफ कमिशन', चीन

### मेक्सिकोपाठोपाठ कॅनडालाही दिलासा

मेक्सिको, कॅनडा आणि चीनच्या उत्पादनांवरील आयात शुल्क मंगळवारपासून लागू होणार होते. मात्र, मेक्सिकोच्या अध्यक्ष क्लॉडिया शिनबाऊम आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी अध्यक्ष ट्रम्प यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली. सीमा शिनबाऊम आणि ट्रुडो यांनी सुरक्षा व अमली पदार्थांची तस्करी यासंबंधी ट्रम्प यांच्या चिंता दूर करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर या दोन्ही देशांवरील आयात शुल्काला एका महिन्याची स्थगिती देण्यात आली.

मात्र, यावेळी अमेरिका उत्तर देण्यासाठी चीन अधिक सक्षम आहे असे विश्लेषकांचे मत आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे माजी अधिकारी आणि 'स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीज सेंटर'चे संचालक फिलिप ल्युक सोमवारी एका कार्यक्रमात म्हणाले की, "त्यांची निर्यात नियंत्रण व्यवस्था आता अधिक विकसित आहे. गॅलियम, जर्मेनियम, ग्रॅफाइट आणि इतर अनेक महत्त्वाच्या खनिजांसाठी आपण त्यांच्यावर अवलंबून आहोत. त्यामुळे ते आपल्या अर्थव्यवस्थेचे लक्षणीय नुकसान करू शकतात."

---

# दिल्ली'साठी आज मतदान

## तिरंगी सामन्यात मतटक्क्यावर सत्तेचे गणित

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभेसाठी बुधवारी मतदान होत आहे. सत्तारूढ आम आदमी पक्ष (आप) विरोधात भारतीय जनता पक्ष तसेच काँग्रेस असा तिरंगी सामना होईल. राजधानीत एकूण एक कोटी ५६ लाख मतदार आहेत. मतटक्का वाढविण्यासाठी विविध व्यावसायिकांनी सवलती जाहीर केल्या आहेत.**



अरविंद केजरीवाल यांचा 'आप' सलग तिसऱ्यांदा सत्तेत येण्याच्या प्रयत्नशील आहे. भाजपने यंदा जोरदार प्रचारमोहीम राबवली. दिल्लीत २६ वर्षांनंतर सत्तेत येण्याची त्यांना आशा आहे. काँग्रेसने तगडी लढत दिली असून, गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत एकही जागा जिंकता आलेली नाही. आम आदमी पक्षाने प्रचारात सुशासनाच्या मुद्द्यावर भर दिला. तसेच सरकारच्या कल्याणकारी योजना केजरीवाल तसेच मुख्यमंत्री अतिशी यांनी प्रचारातून मांडल्या. भाजपकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी प्रचारात आप सरकारवर टीकास्त्र सोडले. तर विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी काँग्रेसच्या प्रचाराची धुरा सांभाळली. ८ फेब्रुवारीला मतमोजणी होईल. मतदान किती होते त्यावर निकालाचे गणित अवलंबून आहे. मतदानानंतर सलून तसेच ब्युटी पार्लरमध्ये २० ते ५० टक्के सवलत उद्योग व व्यापार संघटनेने (सीटीआय)जाहीर केली.

### राजकीय पक्षांची आश्वासने

शीशमहल, यमुना नदीच्या प्रदूषणाची समस्या तसेच मतदार याद्यांमध्ये घोळ झाल्याचा आरोप प्रचारादरम्यान करण्यात आला. जाहीरनाम्यात 'आप'ने विद्यार्थ्यांना मोफत प्रवास, रिक्षा तसेच टॅक्सी चालकांसाठी विमा, पुजारी, गुरुद्वारा ग्रंथींसाठी १८ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले. भाजपने गर्भवतींना २१ हजारांची मदत, स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर अनुदानित म्हणजे ५०० रुपयांत देण्याचे जाहीर केले. काँग्रेसने बेरोजगारांना प्रतिमहिना साडेआठ हजार देऊ असे आश्वासन दिले.

# निधीचा वापर देशासाठीच! पंतप्रधानांचे लोकसभेत प्रत्युत्तर

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

दिल्लीतील मतदानाच्या पूर्वसंध्येला, मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेला उत्तर दिले. दीड तासांच्या या भाषणात मोदींनी अप्रत्यक्षपणे आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवालांवर शरसंधान साधले. 'शीशमहल, जकुझी, स्टायलिश शॉवर अशा चैनीच्या वस्तूंवर लक्ष असणारे जनतेचा विकास कसा करणार', असा सवाल मोदींनी केला. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही मोदींनी कानपिचक्या दिल्या. 'झोपडीत जाऊन फोटोसेशन करणाऱ्यांना संसदेतील गरिबांच्या कल्याणाची भाषा बोअरिंगच वाटणार', असा टोमणा मोदींनी हाणला. 'इंडिया' आघाडीतील नेत्यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना मोदींनी एनडीए सरकारच्या जनकल्याणाच्या योजनांचा पाढा वाचला. 'पूर्वीप्रमाणे केंद्र सरकारच्या घोटाळ्यांचे मथळे वृत्तपत्रात येत नाहीत. १० वर्षांत घोटाळे न झाल्याने कोट्यवधी रुपयांची बचत झाली असून ते एनडीए सरकारने लोकांच्या विकासासाठी वापरले. आमच्या निर्णयामुळे बचत होती, त्याचा वापर आम्ही शीशमहल बनवण्यासाठी नव्हे तर, देश उभारण्यासाठी करतो', असे मोदी म्हणाले. काही राजकीय पक्ष फक्त आश्वासने देतात पण, पूर्ण करत नाहीत. हे पक्ष तरुणांच्या भवितव्यर 'आपदा' बनून कोसळत आहेत. आम्ही कसे काम करतो हे हरियाणाने पाहिले आहे. 'बिनाचिठ्ठी' नोकरी (पान ८ वर) (पान १ वरून) देत आहोत. आम्ही सांगतो तेच करतो म्हणूनच हरियाणामध्ये आम्ही तिसऱ्यांदा विजयी झालो. महाराष्ट्रातही ऐतिहासिक विजय मिळाला. पहिल्यांदाच भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या. लोकांच्या आशीर्वादाने हे घडू शकले, असे म्हणत मोदींनी दिल्लीतील निवडणुकीच्या राजकारणाचे इप्सित साधल्याचे स्पष्ट झाले. केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये १२ लाखांच्या उत्पन्नावरील करमुक्तीच्या घोषणेचाही मोदींनी उल्लेख केला.

# खुशी कपूरची तिच्या सौंदर्यावरून उडवली जात होती खिल्ली

बॉलीवूड अभिनेत्री खुशी कपूर सध्या तिच्या आगामी चित्रपटाचे प्रमोशन करण्याच्या कामात व्यग्र आहे. लवकरच जुनैद खानबरोबर खुशी कपूर ‘लवयापा’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे खुशी सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. खुशीचं चर्चेत येण्याचं आणखी एक कारण म्हणजे तिनं नुकतीच प्लास्टिक सर्जरी केली आहे. तसेच तिनं आता तिच्या आयुष्यातील सुंदरतेविषयी बालपणीचे काही किस्से सांगितले आहेत.

खुशी कपूर नुकतीच ‘लवयापा’ चित्रपटाच्या प्रमोशनसाठी स्क्रीन लाइव्हमध्ये आली होती. यावेळी मुलाखतीमध्ये तिनं सुंदरतेविषयी बालपणीच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. लहान असताना तिला



तिच्या दिसण्यावरून चिडवलं जात होतं. तसेच यामुळे तिच्या मनावर याचा काय परिणाम झाला. सौंदर्य वाढवण्यासाठी खरेपणानं आपल्या मनाचं ऐकणं किती महत्त्वाचं आहे, या सर्वांसंदर्भात खुशीनं तिचं मत मांडलं आहे. लहान होते, तेव्हा माझ्या दिसण्यावरून माझी खिल्ली उडवली जात होती. तू तुझ्या आई आणि बहिणीसारखी सुंदर नाही दिसत, असं म्हटलं जात होतं. हे अतिशय वाईट आहे. लहान असताना असं ऐकल्यानं माझा आत्मविश्वास कमी झाला होता.” “मला वेगळं राहणं फार आवडायचं आणि मला नाही वाटत यात काही गैर आहे. लोक नेहमी मला हे कर, ते करू नको असं सांगत असतात. मीदेखील यातील मला योग्य वाटलेल्या गोष्टी फॉलो केल्या आहेत. स्किनकेअर या अशा गोष्टी नाहीत की, ज्यावर एखाद्या व्यक्तीविषयी फार जास्त चर्चा करावी.”

## नताशा आई म्हणून ग्रेटच...

बॉलीवूड अभिनेता वरुण धवन बाबा झाला आहे. वरुण धवन व नताशा दलाल यांच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालं आहे. नताशाने बाळाला जन्म दिला असून वरुणचे बाबा व बाळाचे आजोबा डेव्हिड धवन यांनी आनंदाची बातमी दिली आहे.आज दुपारी वरुण मुंबईतील रुग्णालयाबाहेर पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला होता. तेव्हापासून वरुणच्या बाळाबद्दल चर्चा सुरू होती. नताशाची प्रसूती झाली असून तिने गोंडस लेकीला जन्म दिला आहे. डेव्हिड धवन यांनी बाळाची भेट घेऊन रुग्णालयातून निघताना नताशाने मुलीला जन्म दिल्याची माहिती दिली. डेव्हिड धवन यांचा व्हिडीओ वरिंदर चावला या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. वरुण व नताशा यांना मुलगी झाली आहे, असं डेव्हिड धवन यांनी सांगितलं.वरुण धवन व नताशा लग्नानंतर तीन वर्षांनी आई- बाबा झाले आहेत. फेब्रुवारी महिन्यात वरुण व नताशा यांनी ते आई- बाबा होणार असल्याची बातमी सोशल मीडियावर पोस्ट करून शेअर केली होती. वरुणने नताशा व त्याचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. फोटोमध्ये वरुण गरोदर नताशाच्या बेबी बंपचे चुंबन घेताना दिसत होता. हा फोटो शेअर करत त्याने “आम्ही प्रेग्नंट आहोत, आम्हाला तुमच्या प्रेमाची व आशीर्वादाची गरज आहे,” असं लिहिलं होतं. सेलिब्रिटी व चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट करत दोघांचे अभिनंदन केले होते.



## अमिर खानच्या मुलीचे लग्न अन् बरंच काही...

बुधवारी संध्याकाळी आमिर खानची मुलगी आयरा आणि फिटनेस एक्सपर्ट नुपूर शिखरे यांचा उदयपूरच्या हॉटेल ताज अरावली पॅलेसमध्ये विवाह झाला. हॉटेलच्या मयूरबागेत दुपारी 4 वाजता सुरू झालेल्या लग्नसोहळ्यासाठी आमिर खान आणि त्याची आई झीनत हुसैन वधू आयराला मंचावर घेऊन आले. यानंतर आयरा आणि नुपूर शिखरे यांनी एकमेकांचा हात धरला आणि एकत्र राहण्याचे वचन दिले. दोघांनीही एकमेकांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी पांढऱ्या रंगाच्या थीमने मंडप सजवण्यात आला होता. लग्नानंतर, एक कौटुंबिक फोटोशूट झाले ज्यामध्ये आमिर खानच्या दोन्ही माजी पत्नी रीना दत्ता, किरण राव, पुतण्या इम्रान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. फोटोशूटनंतर रात्रीचे जेवण झाले ज्यात पाहुण्यांना महाराष्ट्रीयन, राजस्थानी आणि गुजराती जेवण देण्यात आले. कढी-तांदूळ, राजस्थानी डाळ-बाती-चुरमा आणि डाळ-ढोकळा यांचाही मेनूमध्ये विशेष समावेश होता. तत्पूर्वी, मंगळवारी रात्री एका संगीत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये आमिरने हृतिक रोशनच्या 'कोई मिल गया' या चित्रपटातील 'इट्स मॅजिक...' या गाण्यावर खास परफॉर्मन्स दिला होता. आमिरने दुसरी माजी पत्नी किरण राव आणि मुलगा आझादसोबत स्टेजवर 'एक हजारों में मेरी बहना है..' हे गाणे गायले. या कार्यक्रमात परफॉर्म करण्यासाठी आमिर गेल्या काही दिवसांपासून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेत होता. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या संगीत सेरेमनीमध्ये आयरा आणि नुपूरच्या कुटुंबातील सदस्यांनी आपापल्या परफॉर्मन्स दिला. पाहुण्यांनी पंजाबी आणि बॉलीवूड गाण्यांवर जोरदार नृत्य केले. फंक्शनमध्ये आयरा एम्ब्रॉयडरी लेहेंग्यात तर नुपूर पँट-सूटमध्ये दिसला. या जोडप्याचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यांनी सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ शेअर केले आहेत.

## माधुरी दीक्षितचे ओठ निळे पडले अन् थांबवावं लागलेलं शूटिंग...



बॉलीवूडची ‘धकधक गर्ल’ माधुरी दीक्षित आणि अभिनेते अनिल कपूर यांच्या मुख्य भूमिका असलेल्या ‘पुकार’ चित्रपटाला आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ‘पुकार’ सिनेमाचं नाव जरी घेतलं तरी माधुरी आणि प्रभुदेवा यांचा ‘हे के सेरा सेरा’ गाण्यावरचा जबरदस्त डान्स डोळ्यासमोर उभा राहतो. या सिनेमात आणखी एका गाण्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं ते म्हणजे ‘किस्मत से तुम हमको मिले’. हे गाणं बर्फाळ प्रदेशात शूट करण्यात आलं आहे. स्क्रिप्टनुसार माधुरीला बर्फाळ प्रदेशात शिफॉन साडी नेसून या गाण्यासाठी शूट करायचं होतं. या दरम्यान अभिनेत्रीची अवस्था फार बिकट झाली होती. याचा अनुभव ‘धकधक गर्ल’ने स्वत: एका मुलाखतीत सांगितला होता. ‘पुकार’मधलं ‘किस्मत से तुम’ हे गाणं अलास्कामध्ये शूट करण्यात आलं आहे. यादरम्यानचा अनुभव माधुरीने ‘बॉलीवूड हंगामा’ला दिलेल्या मुलाखतीत सांगितला होता. कलाकारांना गाण्यावर लिप-सिंक करावं लागतात, थंड वातावरणात लिप-सिंक करणं काहीसं कठीण जातं. त्यात माधुरी हे गाणं हिमनदीवर शूट करत होती. अभिनेत्रीने गाण्याच्या चित्रीकरणादरम्यान निळ्या रंगाची शिफॉन साडी नेसली होती. तर, अनिल कपूर यांनी टी-शर्ट आणि त्यावर कोट घातला होता. परिणामी, प्रचंड थंडीमुळे



माधुरीला या गाण्याच्या शूटिंगदरम्यान सुरुवातीला अतिशय बिकट परिस्थितीचा सामना करावा लागला होता.

# मानाच्या दोन्ही गदा परत करणार!

## डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांची मोठी घोषणा

। मुंबई । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अहिल्यानगरमध्ये २ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र केसरी २०२५ स्पर्धा पार पडली. मात्र, या स्पर्धेत उपांत्य आणि अंतिम फेरीत मोठा गोंधळ पाहायला मिळाला. पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ यंदाचा महाराष्ट्र केसरी ठरला आहे. पण पृथ्वीराज मोहोळने उपांत्य फेरीत पैलवान शिवराज राक्षे आणि अंतिम फेरीत पैलवान महेंद्र गायकवाडवर विजयी मात करत मानाची गदा पटकावली. पण या दोन्ही फेरीच्या सामन्यांमध्ये मोठा वाद निर्माण झाला. तसेच सामन्यानंतर पंचांशी हुज्जत घातल्याप्रकरणी पैलवान शिवराज राक्षे आणि पैलवान महेंद्र गायकवाड यांना कुस्तीगीर परिषदेने तीन वर्षांसाठी निलंबित केलं. दरम्यान, या वादावर प्रतिक्रिया देताना दोन वेळा महाराष्ट्र केसरी झालेल्या चंद्रहार पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मानाच्या दोन्ही गदा परत करणार असल्याचं चंद्रहार पाटील यांनी म्हटलं आहे.**



### चंद्रहार पाटील काय म्हणाले?

“२००७ साली महाराष्ट्र केसरी होत असताना मी सांगली जिल्ह्याला २७ वर्षांनंतर मानाची गदा मिळवून दिली. अनेक वर्ष डबल महाराष्ट्र केसरी कोणीही नव्हतं. पण मला आणि सांगली जिल्ह्याला डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळाला. तसेच तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीसाठी मैदानात उतरणारा पैलवान मी होतो. आता ज्या प्रकारे शिवराज राक्षेवर पंचांनी अन्याय केला, शिवराज राक्षेला ज्या प्रकारे हरवण्यात आलं. त्याच प्रकारे मलाही तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होत असताना हरवण्यात आलं होतं”, असा आरोप आता चंद्रहार पाटील यांनी केला आहे.

चंद्रहार पाटील पुढे म्हणाले की, “एका लाईव्ह कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे त्यावेळचे उपाध्यक्ष काकासाहेब पवार यांनी कबुली दिली की चंद्रहार पाटील यांच्यावर अन्याय झालेला आहे. तसेच संदीप आप्पा भोंडवे हे आज कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष आहेत. त्यांनी देखील कबुली दिली आहे की २००९ मध्ये चंद्रहार पाटील यांच्यावर अन्याय झाला. मग आता सर्वच पदाधिकाऱ्यांनी कबूल करावं की माझ्यावर अन्याय झालेला आहे. मग माझ्या मनाचं समाधान होईल”, असं चंद्रहार पाटील यांनी म्हटलं.

### ‘माझ्यावर तेव्हा आघात झाला...’

“आज मी कुठल्याही महाराष्ट्र केसरी कुस्तीच्या स्पर्धा पाहायला जात नाही. माझ्यावर तेव्हा जो आघात झाला त्यामधून आजही मी बाहेर निघालेलो नाही. त्यावेळी पंचांच्या चुकीच्या निर्णयामुळे मला हरवण्यात आलं तेव्हा मी आत्महत्या करण्याच्या मनस्थितीत होतो. मात्र, सहकार्यांच्या मदतीने मी त्यामधून बाहेर निघालो. मात्र, अशीच वेळ आज शिवराज राक्षेवर आलेली आहे. पंचांच्या एका चुकीच्या निर्णयामुळे शिवराज राक्षेचं आयुष्य बरबाद झालं. मलाही त्यामधून कुठेतरी बाहेर पडायचं आहे. त्यामुळे दोन दिवसांच्या आत सर्वांनी कबुली नाही दिली तर मी महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा परत करणार आहे”, असं चंद्रहार पाटील यांनी म्हटलं आहे.

### रामदास तडस यांनी मौन सोडलं

पाच दिवसांच्या कुस्तीत अनेक कुस्तीपटूंचा उत्साह पाहायला मिळाला, असं सांगत रामदास तडस यांनी मुख्य मुद्द्याला हात घातला. शेवटच्या दिवशी उपांत्य फेरीचा सामना कुस्तीपटू शिवराज राक्षे आणि मोहोळ यांच्यात झाला.कुस्ती सुरू झाल्यानंतर तिसऱ्या मिनिटाला मोहोळ यांनी शिवराज राक्षेला खाली घेतला. पंचांनी मोहोळ जिंकल्याचा निकाल दिला. पंच, सरपंच आणि मॅच चेअरमन या तिघांची एकच बाजू असली तर ती खरी मानली जाते. तिघांनीही एकच निकाल दिला. पण शिवराज राक्षे यांनी संघटनेकडे दाद मागितली नाही. संघटनेचा अध्यक्ष म्हणून मी तेथे होतो. सेक्रेटरी होते. पण याकडे न येता रेफरीकडे जावून शर्ट पकडले आणि त्यांना लाथ मारली, हे संयुक्तिक नव्हतं.

# रणजी ट्रॉफी : मुंबईच्या संघात मोठे बदल!

## उपांत्यपूर्व फेरी: टीम इंडियाच्या खेळाडूंना दिली संधी

। अहिल्यानगर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**रणजी ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीसाठी मुंबईने आपला संघ जाहीर केला आहे. गट सामन्यासाठी भारतीय संघाचे खेळाडू संघाचा भाग होते. पण आता चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी होणाऱ्या इंग्लंडविरूद्धच्या वनडे मालिकेसाठी रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर हे खेळाडू भारतीय संघात सामील झाले आहेत. दरम्यान इंग्लंडविरूद्धची टी-२० मालिका संपल्यानंतर या मालिकेतील खेळाडू रणजी संघात सामील झाले आहेत.**



मोठी बातमी म्हणजे सूर्यकुमार यादवचा संघात प्रवेश झाला असून श्रेयस अय्यरच्या जागी त्याची निवड करण्यात आली आहे. मुंबईचा संघ हरियाणाविरुद्ध रणजी ट्रॉफीची उपांत्यपूर्व फेरी खेळणार आहे. हा सामना लाहली क्रिकेट मैदानावर होणार आहे. तर अष्टपैलू शिवम दुबेचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे. या सामन्यापूर्वी पृथ्वी शॉचीही मुंबई संघात निवड झालेली नाही. मुंबईने १८ सदस्यीय संघ निवडला असून त्यात अनेक मोठ्या नावांचा समावेश आहे. श्रेयस अय्यर इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळणार आहे, त्यामुळे तो मुंबई संघात नाही. रणजी ट्रॉफीच्या या मोसमात मुंबईची चांगली कामगिरी पाहायला मिळाली. त्यांनी फक्त एकच सामना गमावला आहे. हा पराभव त्यांना जम्मू-काश्मीर संघाविरूद्ध मिळाला. याशिवाय मुंबईने बडोद्याचा ८४ धावांनी पराभव केला. या संघाने महाराष्ट्रावर ९ गडी राखून विजय मिळवला. त्रिपुराविरुद्धचा सामना अनिर्णित राहिला पण त्यानंतर संघाने ओडिशाचा एक डाव आणि १०३ धावांनी पराभव केला. मुंबई संघाने सर्व्हिसेसविरुद्धचा सामना ९ गडी राखून जिंकला.

### उपांत्यपूर्वी सामन्यासाठी मुंबईचा संघ

अजिंक्य रहाणे, आयुष म्हात्रे, अंगकृष्ण रघुवंशी, अमोघ भटकळ, सूर्यकुमार यादव, सिद्धेश लाड, शिवम दुबे, आकाश आनंद, हार्दिक तामोरे, सुर्यांश शेडगे, शार्दुल ठाकूर, शम्स मुलानी, तनुष कोटियन, मोहित अवस्थी, सिल्वेस्टर डिसूजा, रॉस्टन डायस, अथर्व अंकोलेकर आणि हर्ष तन्ना.

## पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, रावेतच्या

# विद्यार्थ्यांची मॅप्रो कंपनीला औद्योगिक भेट!

### शिक्षण विश्व: प्राचार्या डॉ. स्मृती पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हल्लीच्या विपणन किंवा अकाउंटिंग क्षेत्र हे सर्वव्यापी आहे. अकाउंटिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने चांगल्या संधी उपलब्ध आहेत. अकाउंटंट अर्थात लेखापालांची आज नितांत गरज असताना, आगामी काळात त्यांची गरज आणखी वाढेल असे मत आकुर्डी येथे व्याख्यानमालेत व्यक्त करण्यात आले.**




पिंपरी-चिंचवड : रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी वाई येथील मॅप्रो कंपनीच्या कारखान्यात भेट देण्यात आली. प्रा. सुप्रिया कुलकर्णी, प्रा. इश्तप्रीत कौर, प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. राजेश पाटील, प्रा. प्रसाद तांबे आणि प्रा. दुर्गेश पुराणिक यांच्यासह विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्राचार्या डॉ. स्मृती पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. मॅप्रो फूड्स या उद्योग समूहाच्या कारखान्याला भेट देत विद्यार्थ्यांनी अन्न प्रक्रिया, उत्पादन, व्यवस्थापन, विपणन आणि उद्योगाच्या विविध टप्प्यांबाबत माहिती घेतली. उत्पादन प्रक्रियेत वापरण्यात येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान, मशीनरीचा वापर आणि गुणवत्ता नियंत्रण याविषयी माहिती मिळवली. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळण्यास मदत झाली.पिंपरी-चिंचवड एजुकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

---

# कार्यशाळेतून दिला किल्ल्यांच्या संवर्धनाचा संदेश!

### प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाची इंदुरी किल्ल्यावर कार्यशाळा

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंदुरी येथील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाने ऐतिहासिक स्थळे योजनेंतर्गत किल्ले संवर्धन योजनेअंतर्गत इंदुरी किल्ल्यावर कार्यशाळेचे आयोजन करण्याबरोबरच किल्ल्याची साफसफाई केली. यामध्ये विविध महाविद्यालयातील 58 स्वंयसेवक सहभागी झाले होते.**



इंदुरी येथे प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयामार्फत जिल्हा स्तरीय किल्ले संवर्धन कार्यशाळा संपन्न झाली. प्रा. रामकृष्ण मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आकुर्डी -४४ (स्वायत्त) राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ऐतिहासिक स्थळे योजनेतंर्गत किल्ले संवर्धन (इंदुरी किल्ला) एक दिवसीय जिल्हा स्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील 58 स्वंयसेवक सहभागी झाले होते. किल्ले संर्वधन उपक्रमाच्या उदघाटन प्रसंगी इंदुरी गावाचे सरपंच निशिकांत शिंदे ,भटकंती सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष निलेश मांडेकर, खजिनदार अनिकेत भांगरे, राहुल कुंभार राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ सारिका मोहोळ उपस्थित होते. निलेश मांडेकर यांनी विद्यार्थ्यांनी गडाचा इतिहास, दाभाडे घराण्याची इतिहासातील शौर्य परंपरा तसेच गडीतील विविध वास्तूची माहिती आपल्या मनोगतातून स्वयंसेवकांना दिली. स्वयंसेवकांनी किल्ल्यामधील कडजाई मंदिर,बापूजीबुवा मंदिर परिसरातील प्लास्टिक संकलन करून परिसर स्वच्छ केला. तसेच गडामध्ये उभारण्यात आलेल्या 66 फूट ध्वजाच्या सभोवतालील बागकाम करून वृक्षारोपण केले. कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभय खंडागळे, उपप्राचार्य डॉ. एच.बी. सोनवणे,प्रबंधक श्री. संजय झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. सारिका मोहोळ, कार्यक्रम अधिकारी डॉ. मधुकर राठोड प्रा. वैभव साळवे, आणि प्रा. ज्योती झेंडे, प्रा.विक्रांत शेळके, प्रा.मधूजित नाईकवाडी यांनी पार पाडली. तसेच, उपक्रम यशस्वी करण्यामध्ये प्राजक्ता ताम्हणे, पायल रेणुसे असिफ शेख,निलेश इंगळे, राम मुळे या स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


PAKWAN
FOOD TRADITION
भव्य उद्घाटन सोहळा
गुरूवार दि : 06.02.2025 रोजी सायं.06:00 वा. करण्याचे योजिले आहे,
तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे
• निमंत्रक •
श्री. अतिश आनंदाराव बारणे
श्री. संतोष सीताराम बारणे
श्री. अक्षय आनंदाराव बारणे
श्री. प्रविन कुमार राजपुरोहीत
• स्थळ •
देहू रस्ता बारणे पाटील चौक D-MART शेजारी मोशी, पुणे

DHANASHREE
HOSPITAL MOSHI

डॉ. पटवर्धन यांचे

# धनश्री हॉस्पिटल, मोशी

या नुतन अद्ययावत सेवा असलेल्या हॉस्पिटलचा उद्घाटन समारंभ
गुरुवार दि. ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी योजिला आहे

## भव्य उद्घाटन समारंभ

— शुभहस्ते —

**मा. देवेंद्रजी फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



## १०१ बेड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल

| | | | |
|---|---|---|---|
| ओपन हार्ट सर्जरी कॅथ लॅब, अँजिओप्लास्टी | रोबोटिक गुडगा रिप्लेसमेंट | स्त्रीरोग, बालरोग आय व्ही एफ सेंटर | २४x७ अक्सिडेंन्ट व ट्रॉमा सेंटर |
| ३० बेडचे ICCU, PICU, NICU, प्रसूती ICU | ०६ मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर | २४ तास सिटीस्कॅन एक्स-रे सोनोग्राफी | दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |




**धनश्री हॉस्पिटल**
आपलं हॉस्पिटल

मोशी-आळंदी नवीन बी आर टी रस्ता,
क्लासिओ हॉटेल शेजारी, मोशी, पुणे ४१२१०५
www.dhanashreehospitalmoshi.com

संपर्क : +91 84840 07504
+91 84840 07508

Scan for location